# उप निबधक, सहकारी संस्था,सिडको यांचे कार्यालय

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र)मर्यादीत
बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं.८, पाचवा मजला,सी.बी.डी.बेलापुर स्टेशन नवीमुंबई४००६१४ ई-मेल
dyregcidco@gmail.com

---

जा.क्र.उनि/संस्था इमारत./पुर्नविकास/११९७ /२०२६
दिनांक :-२५/०३/२०२६

**प्रति,**
**अध्यक्ष/सचिव**
**गंगोत्री को.ऑप.हौसिंग सोसा.लि.**
**प्लॉट नं.-०४, सेक्टर-०३,नेरुळ,**
**नवीमुंबई**

**विषय:-** **संस्था इमारत पुनर्विकासाबाबत.**

**संदर्भ :-** १.संस्थेकडील दिनांक २६ /०२/२०२६ रोजीचा प्राप्त प्रस्ताव.
२. या कार्यालयाकडील प्राधिकृत अधिकारी नियुक्तीबरबतचे दिनांक २७/०२/२०२६ रोजीचे पत्र.
३. प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयास दिनांक २५/०३/२०२६ रोजी सादर केलेला विशेष सर्वसाधारण सभेचा अहवाल.
५. सहकार,पणन व वस्त्रोग विभाग,महाराष्ट्र शासन विभागाकडील शासन निर्णय क्र.सुगृयो२०१८ प्र.क्र.८५/१४-स,दिनांक ०४/७/२०१९ रोजीचा शासन निर्णय

उपनिबंधक सहकारी संस्था सिडको
सत्यमेव जयते
नवी मुंबई

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अवलोकन व्हावे.

२/- **गंगोत्री को.ऑप.हौसिंग सोसा.लि.प्लॉट नं.-०४, सेक्टर-०३,नेरुळ,नवीमुंबई** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्र.एनबीओएम/सिडको/एचएसजी/(टि.सी.)/१०३४४/डीआर//२०२५-२६ दिनांक ०५/०९/२०२४ असा आहे.

संस्थेकडील संदर्भ क्र.०१ रोजीच्या विषयांकीत प्रस्तावास अनुसरुन, संस्था इमारत पुर्नविकासाकरिता, विकासक निवड करणेबाबतच्या दिनांक १५/०३/२०२६ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाणेकरिता या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ०२ अन्वये श्री.शरद वाघमारे,सहकार अधिकारी श्रेणी-१ अधिन सहनिबंधक,सहकारी संस्था,सिडको यांना प्राधिकृत करण्यांत आले होते.

प्राधिकृत अधिकारी शरद वाघमारे यांनी संस्थेकडील दिनांक १५/०३/२०२६ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून सभेचा अहवाल दिनांक २५/०३/२०२६ रोजी या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाचे व सहपत्रांचे अवलोकन केले असता, संस्था इमारतीच्या पुर्नविकासाकरिता संस्था इमारतीच्या संस्थेच्या दिनांक १३/०४/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत ठराव क्र.०२ अन्वये **मे.डायमेंशन आर्किटेक्ट प्रा.लि.** या संस्थेची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

संस्था इमारतीच्या पुर्नविकासाच्या अनुषंगाने विकासक निवडीबाबतची सभा गजानन महाराज मंदिर हॉल,प्लॉट क्र.१७,सेक्टर-२९, नेरुळ,नवीमुंबई येथे दिनांक १५/०३/२०२६ रोजी सायंकाळी १२.०० वा. आयोजित करण्यांत आली होती. संस्था इमारतीमधील सदनिकांची संख्या ८८ आहे. ८८ सदनिका धारकांपैकी ८१ सदनिका धारक संस्थेचे सभासद आहेत. सदर

८१ सदनिकाकरिता ८१ सभासद आहेत.संस्थेचे ६५ सभासद सभेस उपस्थित राहिले आहेत. सभेस उपस्थित सभासदांची टक्केवारी ८० % इतकी आहे. त्यामुळे शासन निर्णय दिनांक ०४/७/२०१९ मधील १७ (क) प्रमाणे विशेष सर्वसाधारण सभेचा कोरम पूर्ण झाला आहे.

संस्था इमारतीच्या पुनर्विकासाचे अनुषंगाने दिनांक १५/०३/२०२६ रोजी आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत उपस्थित ६२ सभासदांनी संस्था इमारतीचा पुनर्विकास करणेसाठी विकासक म्हणून **मे.अबोड इन्फ्राकॉन.,** यांची निवड केलेली आहे व तसा नियुक्तीचा ठराव उपस्थित असलेल्या सभासदांनी सर्वानुमते केलेला आहे.

सबब, संस्थेने या कार्यालयात दाखल केलेला पुनर्विकासाचा प्रस्ताव,संस्थेच्या दिनांक १५/०३/२०२६ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयात दाखल केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता संस्थेने इमारतीच्या पुनर्विकासासाठी **मे.अबोड इन्फ्राकॉन.,** यांची विकासक म्हणून नियुक्ती केल्याचे निदर्शनास येते व सदर कागदपत्रांची नोंद या कार्यालय स्तरावर घेण्यांत येत आहे.

(प्रताप पाटील)
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था,सिडको,नवीमुंबई**

उपनिबंधक सहकारी संस्था सिडको नवी मुंबई
सत्यमेव जयते

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**
मा.अतिरिक्त नगररचना अधिकारी,बांधकाम विभाग,नवीमुंबई महानगरपालिका,नवीमुंबई.

**उपनिबंधक**
**सहकारी संस्था,सिडको,नवीमुंबई**